


स्नेहवन वार्ता
एक आशेचा किरण

एप्रिल २०२४

संपादन व मार्गदर्शन : नयना निर्गुण
संकलन व लेखन : श्रीकांत, वैभव, दीपक

या सुखांनों साद घालु
दु:खितांच्या जिवनी...
फुल नाही तर पाकळी होवू।
दु:खितांच्या जिवनी सुगंध देवू।।

वेबसाईट- www.snehwan.in | फेसबुक- www.facebook.com/snehwan | Instagram- www.instagram.com/ashok.snehwan | पत्ता : स्नेहवन, कोयाळी फाटा, कोयाळी फॉरेस्ट, कोयाळी तर्फे चाकण, ता. खेड, जि. पुणे - ४१०५०१

# नवरंगांबरोबर स्नेहाची उधळण



## 'स्नेहवन'मध्ये होळी, धुलिवंदन पारंपरिक पद्धतीने साजरे

***त्रिविध तापांची । करुनिया होळी***
***विठ्ठला सांभाळी । अंतर्बाह्य ।।१।।***
***ठोकोनिया बोंब । द्वेष दर्प नावे***
***कर्म आचरावे । निष्काम ते ।।२।।***
***दहन ते व्हावे । दोषांचे नर्तन***
***अंतरी कीर्तन । कैवल्याचे ।।३।।***
***म्हणे विठ्ठदास । चित्त शुद्ध होती***
***विकार लोपती । देहातुनी ।।४।।***

**- अशोक देशमाने, स्नेहवन**



स्नेहवनमध्ये होळीचा सण पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. होळी म्हणजे वसंत ऋतूचे आगमन. वाईटावर चांगल्याचा विजय म्हणजे होळी. राग, द्वेष, मत्सर आदी भावनांचे होळीत दहन करून परस्परांमध्ये प्रेम, आपुलकीचे नाते ठेवा, असा संदेश देणारा हा सण सर्वांच्या आवडीचा... खास करून बालगोपाळांचा.

स्नेहवनमध्ये मुलांनी लाकडे, गोवऱ्या रचून, त्याला पताकांची सजावट करून, त्याभोवती रांगोळी काढून होळीची जय्यत तयारी केली. सायंकाळी ६ वाजता होळीची पूजा करण्यात आली. त्यानंतर ती पेटवण्यात आली. होळीला नारळ अर्पण करून नैवद्य दाखविण्यात आला. पेटलेल्या होळीभोवती मुलांनी नाचत फेर धरला. बोंबा मारत सर्वांनी प्रदक्षिणा घातल्या.

ग्लोबल क्लासरुम उपक्रमांतर्गत नेदरलँडहून आलेली अनी हुगेंड्रर्न तसेच जपानहून आलेली हीना या परदेशी विद्यार्थिनींही होळीचा आनंद लुटला. भारतीय संस्कृतीविषयी त्यांना कुतुहल वाटले.

अशोक देशमाने सरांनी सर्व बाळगोपाळांना होळी का साजरी केली जाते आणि होलिका दहनामागील इतिहास समजावून सांगितला. भक्त प्रल्हादाप्रमाणे सर्वांची भक्ती पांडुरंगाच्या चरणी दृढ असावी, वाईट गोष्टींचा, विचारांचा, कृतीचा त्याग करावा आणि चांगले विचार आचारणात आणावे, असे सांगत देशमाने सरांनी मुलांना होळीचे महत्त्व समजावून सांगितले.

त्यानंतर होळी रे होळी ,पुरणाची पोळी..! असे म्हणत स्नेहवन परिवारातील सदस्यांनी पुरणपोळी आणि इतर स्वादिष्ट पक्वान्नांचा आस्वाद घेतला. अशा प्रकारे होळीचा पहिला दिवस साजरा करण्यात आला.

होळीच्या दुसऱ्या दिवशी धुलिवंदन. यादिवशी सकाळपासूनच बाळगोपाळ रंग खेळण्यासाठी उत्सुक होते. सूर्योदय होताच सर्वांनी जल्लोष सुरू केला. सर्वात आधी प्रथेप्रमाणे होळी पेटवलेल्या ठिकाणी जाऊन तिथली राख मुलांनी आपल्या संपूर्ण अंगाला लावली. त्यानंतर स्नेहवनमधील गोपाळांनी रंगाची उधळण केली. आधी देशमानेसर आणि अर्चनामॅडम यांना रंग लावून रंगमय शुभेच्छा दिल्या. त्यानंतर सवंगड्यांवर रंगाची उधळण केली. सुमारे दोन तास हा उत्सव रंगला. 'स्नेहवन'मध्ये स्नेहाच्या रंगाची उधळण झाली.

# प्रशांत दामले यांच्याकडून कामाचे कौतुक

## मानधनातील ७५ टक्के रकमेची दिली 'स्नेहवन'ला देणगी

अनुष्का श्री कलामंच आणि श्री समर्थ प्रतिष्ठान, निगडी प्राधिकरण यांच्या वतीने १५ मार्च रोजी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात स्नेहवनचे संस्थापक अशोक देशमाने व अर्चना देशमाने यांचा कार्यगौरव करण्यात आला.

प्रसिद्ध अभिनेते प्रशांत दामले यांच्या हस्ते देशमाने दांपत्याचा सन्मान करण्यात आला. हजारहून अधिक प्रेक्षकांच्या उपस्थितीत हा गौरव झाला. यावेळी अशोक देशमाने यांनी मनोगतात स्नेहवनचा प्रवास उलगडला.

त्यानंतर श्री. हेमंत बर्वे यांनी अभिनेत प्रशांत दामले यांची मुलाखत घेतली. मुलाखत संपताच बर्वे यांनी उपस्थितांना स्नेहवनच्या कामाबद्दल माहिती दिली. स्नेहवनच्या कामामुळे प्रभावित होऊन प्रशांत दामले यांनी त्याचक्षणी त्यांच्या त्या दिवशीच्या मानधनातील ७५ टक्के रक्कम स्नेहवनला देणगी म्हणून दिली. संस्थेच्या कामाचे खूप कौतुक केले.



स्नेहवनसाठी हा मोठा आशीर्वाद आहे, अशी प्रतिक्रिया अशोक देशमाने यांनी व्यक्त केली. प्रशांत दामले यांच्यासह शर्मिला महाजन, अमित गावडे आणि विनीता जोशी- सावरकर यांचे त्यांनी आभार मानले .

# स्नेहवन परिवारात नवा सदस्य दाखल

स्नेहवन परिवारात १० मार्च रोजी आणखी एक सदस्य दाखल झाला. संस्थेच्या कामधेनू गोशाळेतील एका गायीने गोंडस वासराला जन्म दिला.

वासराला पाहून बालगोपाळांचा आनंद गगनात मावत नव्हता. वासराची पूजा करण्यात आली. सर्वांनी आनंदाने नवजात वासराचे स्वागत केले. गोशाळेत आता पंधराहुन अधिक वासरे आहेत.



**जनमत**

# इतरांसाठी जगती वेडे



**पुण्यातील शिवम प्रतिष्ठानतर्फे आयोजित कार्यक्रमात 'स्नेहवन'चे संस्थापक अशोक देशमाने यांचे व्याख्यान झाले होते. त्यावेळी संस्थेच्या कामाची माहिती ऐकून प्रभावित झालेल्या तरुण- तरुणींनी 'स्नेहवन'ला आवर्जून भेट दिली. हे तरुण- तरुणी कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी आहेत. भेटीनंतर त्यांच्यापैकी एका तरुणीने उत्स्फूर्तपणे लिहिलेली प्रतिक्रिया...**

**- धनश्री फराटे**

***शहाण्यांचे ते जगणे कैसे***
***जगासारखे जगती ते***
***इतरांसाठी वेडे जगती***
***जगही त्यांच्या मागे वेडे***

'स्नेहवन'चा सुरू असलेला हा ध्येयवेडा प्रवास इतरांचे आयुष्य समृद्ध करता करता स्वतःचे आयुष्य समृद्ध करणारा आहे. ही वास्तविकता नेहमीच आम्हाला प्रेरित करणारी आहे.

जेव्हा एखादी कल्पना आतून पटते, आपल्या मनाचा संपूर्ण गाभारा व्यापून टाकते आणि ती कल्पना जेव्हा सत्यात उतरते, तेव्हा अद्भुत आनंदाची प्राप्ती होते. स्नेहवन सुरू करण्याची अशोक देशमाने यांची कल्पना आज अनेक वंचित मुलांच्या आयुष्यात आनंद पसरवत आहे.

प्रत्येक माणसाच्या आयुष्यात एखादा असा क्षण येतो, की त्यामुळे संपूर्ण आयुष्यालाच कलाटणी मिळते. तो क्षण नेमका पकडणारे असामान्य ठरतात आणि तो गाफीलपणे निसटू देणारे चाकोरीतील सामान्य जीवन जोखडासारखे मरेपर्यंत खांद्यावर वागवतात.

असेच चाकोरीतील सामान्य जीवन न जगता, काकाजींच्या शब्दात सांगायचे तर eat, drink and enjoy, ye dil mange more या भौतिक गोष्टीत न अडकता अर्चनाताई आणि अशोकदादा 'स्नेहवन'चा रथ 'दो दिल एक जान' होऊन सांभाळत आहेत. त्यांच्या या कार्याला आम्हा सर्वांकडून मनापासून सलाम आणि अखंड साथ...

***एका कवीने म्हटले आहे...***
***या देहाकडून त्या देहाकडे,***
***पुण्याचे मोजमाप जावे***
***कोणी होईल न होईल आपुले,***
***आपण साऱ्या जगाचे आकाश व्हावे...***

***उडवुनी जिव्हाळ्याचे पतंग,***
***सूर जीवनाचे गावे***
***ते एक दिवसाचे झाले आपुले,***
***आपण उभ्या साऱ्या आयुष्याचे व्हावे***

'स्नेहवन'च्या भेटीदरम्यान ही कविता आम्ही खऱ्या अर्थाने अनुभवली.

**सुहृदांच्या भेटी**

### मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे यांची भेट

राष्ट्रपती पदक विजेते, पुण्याचे मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र ऊर्फ डी. पी. पोटफोडे यांनी सहकुटुंब 'स्नेहवन'ला भेट दिली. प्रकल्पाच्या कामाची माहिती घेत त्यांनी मार्गदर्शन केले. मुलांबरोबर गप्पा मारल्या. श्री. देवेंद्र पोटफोडे यांना सन २०२१ मध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रपतींचे विशिष्ट अग्निशमन सेवा पदक देऊन सन्मानित करण्यात आले. त्याचप्रमाणे सन २०११ मध्ये उत्कृष्ट सेवेसाठी त्यांना राष्ट्रपती पदक मिळाले आहे.




# चुयेच्या साधना महोत्सवात देशमाने यांचे व्याख्यान



दरवर्षीप्रमाणे चुये (जि. कोल्हापूर) येथे श्री संत बाबामहाराज आर्वीकर यांच्या प्रेरणेने ग्रामस्थांनी १८ व १९ मार्च रोजी साधना महोत्सवाचे आयोजन केले होते.

अध्यात्म आणि भक्तीच्या या पवित्र पर्वात व्याख्यानासाठी अशोक देशमाने यांना निमंत्रित केले होते. सामाजिक कार्याची ग्रामस्थांना ओळख व्हावी, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. कृतीत भक्तीची भर घालणारा हा आदर्श उपक्रम आहे. व्याख्यानाद्वारे लोकांमध्ये सामाजिक भावना रुजावी आणि त्यांच्या कृतीला अध्यात्माची जोड असावी, हा या मागचा हेतू आहे. व्याख्यानात देशमाने यांनी स्नेहवनची उभारणी, वंचित मुलांचे संगोपन करत असताना येणारे अनुभव, या मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी केले जात असलेले प्रयोग यांची उदाहरण देत ग्रामस्थांचे प्रबोधन केले.

## परदेशी मुलींना संस्कृतीची ओळख




स्नेहवनच्या मुलांना शिकविण्यासाठी स्वखर्चाने येणाऱ्या परदेशी पाहुण्यांना संस्थेत भारतीय संस्कृतीची ओळख करून दिली जाते. कोणत्याही देशाची ओळख आणि वेगळेपण हे तेथील लोकांचे खानपान, पेहराव, बोलीभाषा, सणउत्सव यावरून होत असते.

महिलांचा साडी हा पेहराव भारतीय संस्कृतीचे खास वैशिष्ट्य आहे. साडी, तिची नेसण्याची पद्धत याविषयी परदेशी व्यक्तींना नेहमीच कुतुहल वाटते. स्नेहवनमध्ये विविध देशांतून येणाऱ्या विद्यार्थिनीही याला अपवाद नाहीत. त्यांनाही साडी नेसण्याचा मोह आवरत नाही.

यावेळी नेदरलँडहून आलेली अना आणि जपानहून आलेली हीना या दोघींनाही अर्चना यांनी साडी नेसायला शिकवले. दोघींनी साड्या नेसून अगदी भारतीय पद्धतीने मुरडण्याचा आनंद घेतला. आपल्या देशात परत जाताना येथील आठवणींबरोबरच त्या साडीही घेऊन जातील. होळी आणि धुलिवंदनाच्या आनंदोत्सवातही या दोघी सहभागी झाल्या होत्या.

## नेदरलँडच्या विद्यार्थिनीकडून मुलांना इंग्लिशचे धडे

ग्लोबल क्लासरूम उपक्रमाच्या माध्यमातून वेगवेगळ्या देशांतून महाविद्यालयीन विद्यार्थी- विद्यार्थिनी स्नेहवनमधील मुलांना शिकवण्यासाठी येत असतात. या महिन्यात अनी हुगेंडूर्न (Anne Hoogendoorn) ही विद्यार्थिनी नेदरलँडमधून आली आहे. ती स्नेहवनच्या मुलांना इंग्लिश शिकवत आहे. सहा आठवडे ती स्नेहवन परिवाराचा भाग होऊन राहणार आहे. तिच्यापूर्वी जपानहून आलेली हीना या विद्यार्थिनीकडून मुलांनी जपानी संस्कृतीची माहिती घेतली.

## सिंबायोसिसच्या विद्यार्थ्यांचे १२० तासांचे सेवा शिक्षण

पुण्यातील सिंबायोसिस महाविद्यालयातील सहा विद्यार्थ्यांनी 'स्नेहवन'मध्ये १२० तासांचे सेवा शिक्षण पूर्ण केले.

संस्थेतील मुलांना शिकविण्यासाठी, तसेच इतर सेवा देण्यासाठी हे विद्यार्थी दर शनिवार आणि रविवारी येत होते. संस्थेतील मुलांबरोबर त्यांचे आपुलकीचे संबंध निर्माण झाल्याने आणि संस्थेच्या कामामुळे प्रभावित झाल्याने, ते आता कायमस्वरुपी स्नेहवनशी जोडले गेले आहेत.

**सन्मान**




**बँक ऑफ महाराष्ट्र रिटायर्ड एम्प्लॉईज वेलफेअर ऑर्गनायझेशन यांच्या वतीने पुण्यातील निवारा वृद्धाश्रमात झालेल्या कार्यक्रमात 'स्नेहवन'च्या कार्याचा गौरव करण्यात आला. 'स्नेहवन'चे संस्थापक अशोक देशमाने यांचा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.**